दिनांक 11/10/2022 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र.61

विषय – नगपरिषदांमध्ये “व्दिनोंद लेखांकन अभियान” राबविणेकामी विटा नगरपरिषदेने तयार केलेल्या वार्षिक लेख्यांस मान्यता प्रदान करणेबाबत विचार करणे.

संदर्भ - दिनांक 07/10/2022 ने लेखापाल व मुख्याधिकारी यांचे मंजूर टिपणी नुसार.

मा.संचालक नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांचे जा. क्रं.नपप्रसं. /2022-23/ व्दि.ले.अभियान / कार्या.09 दि. 02 सप्टेंबर 2022 रोजीचे परिपत्रकान्वये, सर्व नगपरिषदांमध्ये लेखा संहिता 2013 मधील तरतुदीनुसार “व्दिनोंद लेखांकन अभियान” राबविणेसंबंधी व त्यानुसार प्रत्येक आर्थिक वर्षाचे वार्षिक लेखे उपर्जित तत्वावरील व्दिनोंद लेखापध्दती नुसार अदयावत करणेसंबंधी आदेश प्राप्त झाले आहेत.तसेच तयार करणेत आलेल्या वार्षिक लेख्यांस सर्वसाधारण सभेची मान्यता घेवून व स्थानिक निधी लेखापरीक्षा कार्यालयाकडून प्रमाणित करून त्याचा अहवाल नगरपरिषद प्रशासन संचालनालयास सादर करावयाचा आहे .त्यानुसार विटा नगरपरिषदेने सन 2009-10 ते सन 2020-21 या वित्तीय वर्षाचे वार्षिक लेखे “व्दिनोंद लेखापध्दती ” नुसार तयार करून घेतले असून ते सनदी लेखापाल यांनी प्रमाणित केलेले आहे.

तरी सदर व्दिनोंद लेखापध्दतीनुसार तयार करणेत आलेल्या वार्षिक लेख्यांस महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायत व औदयोगिक नगरी अधिनियम 1965 चे कलम 102 नुसार मान्यता देत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( संतोष भोर)
प्रशासक
विटा नगरपरिषद, विटा